निरीक्षण
OBSERVATION

उत्तरदायीत्व
ACCOUNTABILITY

निष्कर्ष
FINDINGS

पारदर्शकता
TRANSPARENCY

# सुशासन
# GOOD GOVERNANCE

नियोजन
PLANNING

लेखापरीक्षण
AUDIT

अनुपालन
COMPLIANCE

अतिरिक्त प्रदान
EXCESS PAYMENT

धोरण
POLICY

योजना
SCHEMES

भ्रष्टाचार
CORRUPTION

स्पष्टीकरण
EXPLANATIONS

अनियमितता
IRREGULARITY

अंमलबजावणी
IMPLEMENTATION

गैरव्यवस्थापन
MISMANAGEMENT

दफ्तर दिरंगाई
OFFICIAL DEFERMENT

शासकीय उदासीनता
GOVERNMENT INDIFFERENCE

निष्फळ खर्च
UNFRUITFUL EXPENDITURE

निधीची अडवणूक
BLOCKING OF FUND

लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

थकीत कर्जाची वसुली
NON RECOVERY OF OUTSTANDING LOAN

टाळता येण्याजोगे प्रदान
NON COMMENCEMENT OF RECOVERY

# वार्तापत्र - मे २०२२


**समर्थन प्रकाशन**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☎ ०२२-२२००३०६०
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

## समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**

संपादन : **मुक्ता भारती / हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण

**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

सहाय्य

**स्नेहा घरत** -८४८५८९४४६३

प्रसिद्धी

**मनोज सातवी** -९२७३७९६९९९

मांडणी

**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक**:

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

संपादकीय

# सुशासनासाठी सरकारने ‘सीएजी’च्या अहवालांना गांभीर्याने घ्यावे...

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५१ अंतर्गत स्थापन झालेल्या भारतीय लेखापरीक्षा व लेखा विभाग ‘लोकहितार्थ सत्यनिष्ठा’ Dedicated to truth in public interest... हे ब्रीद डोळ्यांसमोर ठेवून कार्यरत आहे. ***डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना म्हटले होते की, “भारतीय संविधानातील सीएजी हे सर्वात महत्त्वाचे पद असून, संसदेने संमत केलेल्या खर्चापेक्षा अधिकचा खर्च होणार नाही वा ज्या बाबींसाठी खर्च मान्य केला आहे. त्या व्यतिरिक्त इतर बाबींवर तो होणार नाही; यावर लक्ष ठेवणारी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे सीएजी होय.”*** सदर संस्था देशाच्या संपूर्ण आर्थिक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवते. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग, लोकसेवा आयोग यांच्याबरोबरच ***भारतीय लेखापरीक्षण व लेखा विभागाचे महत्त्व भारतीय लोकशाहीत अनन्यसाधारण राहिले आहे. म्हणूनच त्यांना ‘वॉच डॉग ऑफ पब्लिक पर्स’ किंवा ‘गार्डियन ऑफ पब्लिक पर्स’ असेही म्हटले जाते.***

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीत सन १८५८ मध्ये महालेखापाल कार्यालयाची स्थापना झाली तर पुढे १८६० मध्ये सर एडवर्ड ड्रमंड यांची प्रथम महालेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन १९४८ मध्ये भारताचे पहिले नियंत्रक व महालेखापरीक्षक म्हणून श्री. व्ही. नरहरी राव यांची नियुक्ती झाली. त्यांनी आपल्या कारकिर्दीत प्रभावी काम केले. सध्या श्री. गिरीश चंद्र मुर्मू हे भारताचे नियंत्रक महालेखापरीक्षक म्हणून काम पाहत आहेत. आज डिजिटलायजेशनच्या जमान्यात भारतातील आर्थिक गैरव्यवहाराचे स्वरुप व्यापक बनले असून त्यावर नियंत्रण ठेवणे जिकिरीचे झाले आहे. तरीही त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ‘सीएजी’ सारखी संस्था विशेष दक्ष आहे; असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. इतिहासात डोकावल्यावर काय दिसते तर सीएजीने आतापर्यंत भारताच्या इतिहासातील सर्वात वाईट आणि वादग्रस्त धोरणांचे लेखापरीक्षण आणि तपासणी केली आहे. ***देश पातळीवर अलीकडच्या काळात ‘सीएजी’ने कोळसा घोटाळा, टु-जी स्पेक्ट्रम, टेलिकॉम घोटाळा वा कॉमन वेल्थ गेम घोटाळा असे अनेक आर्थिक घोटाळे उघड केले आहेत.***

***राज्याचा विचार केला तर आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेत झालेला गैरव्यवहार, महाराष्ट्र सदन गैरव्यवहार, रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार, गोसीखुर्द सिंचन प्रकल्प किंवा पाटबंधारे प्रकल्पांचे व्यवस्थापनातील गैरव्यवहार व अनियमितता; अशी अनेक प्रकरणे सीएजीने आजपर्यंत उजेडात आणली आहेत.***

त्याच अनुषंगाने वर्ष २०२२च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेवटच्या दिवशी सादर झालेल्या व ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या आणि दुर्लक्षित राहिलेल्या परंतु महत्त्वाचा असलेल्या लेखापरीक्षणाचा अनुपालन अहवालाचा आढावा घेण्याचा प्रयत्न आम्ही या वार्तापत्रात केला आहे. ***या अहवालाचा अभ्यास करताना असे निदर्शनास आले की, निरनिराळे असे ३१ परिच्छेद आणि आढाव्या संदर्भात स्पष्टिकरणात्मक ज्ञापने ३ महिने ते ६ वर्षापेक्षा मोठ्या कालावधीसाठी शासनाकडे उत्तरासाठी प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.*** त्याशिवाय प्राधिकरणांच्या व विभागांच्या चुकीच्या धोरणांमुळे व योजनांच्या अंमलबजावणीमध्ये झालेली अनियमितता, अयोग्य व्यवस्थापन समोर आले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना विविध योजनांच्या लाभापासून कसे वंचित रहावे लागले; हे देखील दिसून आले आहे. त्याशिवाय सरकारच्या कोट्यवधी रुपयांची हानी कशी झाली हे देखील या अहवालातून स्पष्ट झाले आहे. असे असताना इतका मोठा कालावधी उलटूनही आर्थिक व्यवहाराबाबत सरकारचे उत्तरदायित्व नसणे व विरोधी पक्षाकडून या विरोधात सभागृहात व सभागृहाबाहेर अवाक्षरही न काढणे ही बाब सजग नागरिकांच्या मनात चीड उत्पन्न करणारी आहे. त्याचाच आढावा या वार्तापत्रात आपण घेतला आहे.

लेखापरीक्षणातील पहिलेच प्रकरण हे केंद्र सरकारच्या 'राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियाना'बाबत आहे. महत्त्वाच्या अशा अभियानाकडे राज्य शासनाने केलेले दुर्लक्ष, 'राज्य उच्च शिक्षण परिषद' स्थापन करण्यात ३ वर्षापेक्षा अधिक काळ केलेली दिरंगाई, ***उच्च शिक्षणावर राज्याच्या स्थूल राज्य उत्पन्नाच्या २ टक्के खर्च करावा अशी अट असताना केवळ ०.३२ टक्के इतकाच केलेला खर्च. 'उच्च स्तर शिक्षा अभियाना'साठी निवडलेल्या २४ संस्थांवरील शासनाचे नसलेले संनियंत्रण तसेच या संस्थांमधून शिक्षक कर्मचाऱ्यांची ४० टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त असणे, तर 'मुंबई विद्यापीठ' व 'निर्मला निकेतन' यासारख्या मान्यवर संस्थांनी आपल्याकडील शिक्षक कर्मचारी पदांची 'सीएजी'ला माहितीच न देणे अशा अनेक बाबी निदर्शनास आल्या असून त्याबाबत राज्य शासनाने योग्य असे स्पष्टीकरण दिलेले नाही.*** यावरून उच्च शिक्षणाकडे पाहण्याचा राज्य शासनाचा दृष्टिकोन समजतो.

बृहन्मुंबई महानगरपालिका फळे, भाजीपाला, मांस इत्यादीच्या विक्रीसाठी शहरात सार्वजनिक मंडई बांधते. आज महानगरपालिकेच्या अखत्यारित १९५ मंडई आहेत. जानेवारी व फेब्रुवारी, २०२१ रोजी लेखापरीक्षण केले असता त्यांच्या पुनर्विकासाचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे मत 'सीएजी'ने नोंदविले होते. पुनर्विकासासाठी घेतलेल्या ३० मंडईं पैकी २३ मंडई अभिलेख्यांची 'सीएजी'ने तपासणी केली असता केवळ ५ मंडईंचा पुनर्विकास करण्यात आला, तर १८ मंडई या पुनर्विकासापासून वंचित होत्या. बहुसंख्य मंडईंमध्ये अधिकारी व व्यापाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृत वापर वाढून महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत होते. तसेच या मंडईंमध्ये असलेल्या असुविधांमुळे सर्वसामान्य जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत होता. काही मंडईमध्ये दारुचे गुत्ते देखील सुरू असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे.

तिसऱ्या प्रकरणात 'सीएजी'ने मार्च, २०२० मधील छाननीत असे उघड केले की, मुंबई महानगरपालिकेने भाड्याने दिलेल्या जमिनीची मोकळी जमीन असे वर्गीकरण करण्याऐवजी दुकाने व व्यावसायिक गाळे असे चुकीचे वर्गीकरण केले होते. त्यामुळे भांडवली मूल्याची चुकीची गणना केल्याने मुंबई महानगरपालिकेला रु. ७ कोटी ८५ लाखांचे नुकसान सोसावे लागले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून रस्त्यांच्या कामाचे ठेके कंत्राटदारांना दिले जातात. जानेवारी ते मार्च, २०२१ रोजी त्यांच्या अभिलेख्यांच्या तपासणीत असे उघड झाले की, अभियांत्रिकी विभागाने ज्या १७ कंत्राटदारांना रस्त्याचे ठेके दिले होते. त्यापैकी २ ठेकेदारांवर प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची मेहरनजर होती. या २ ठेकेदारांना झुकते माप देऊन त्यांना रु. ४ कोटी ३६ लाखांचा अतिरिक्त फायदा करून दिला होता. याबाबत शासनाने 'सीएजी'ला कोणतेच स्पष्टीकरण दिलेले नाही. यावरून शासनाकडे उत्तरदायित्त्वाचा अभाव असल्याचे दिसून येते.

पुढच्या प्रकरणात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नदीपात्रातच मल:निस्सारण व्यवस्थेचे बांधकाम केले होते ते अनधिकृत ठरले. राष्ट्रीय हरित लवादाने सदर बांधकाम जमीनदोस्त करण्याचे निर्देश दिले. या निर्णयाविरोधात महापालिका मान. सर्वोच्च न्यायालयात गेली. परंतु २० फेब्रुवारी, २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयानेही महापालिकेची सदर याचिका फेटाळून लावत बांधकाम पाडून टाकायला लावले, यामुळे पालिकेचे रु. ३ कोटी २५ लाखांचे नुकसान झाले.

राज्य शासनाच्या ग्रामीण विकास विभागाने ३४ जिल्ह्यांपैकी २९ जिल्ह्यांत 'पंतप्रधान ग्राम सडक योजना' व 'मुख्यमंत्री ग्राम सडक योजने'तील १ हजार २४३ रस्त्यांची कामे दिली होती. त्याबाबतच्या अभिलेख्यांची मार्च, २०२० ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीतील माहिती 'सीएजी'ने मागवली असता धक्कादायक बाब समोर आली. वित्त विभागाच्या सप्टेंबर, २०१७च्या परिपत्रकाप्रमाणे

‘वस्तू व सेवा कर’ (GST) लागू झाला होता. त्यानुसार कंत्राटदारांना द्यावयाच्या रु. २८ कोटी ६३ लाखांच्या रकमेत करापोटी कपात करणे गरजेचे होते; परंतु कार्यकारी अभियंत्यांने वस्तू व सेवा कर कपात न करताच कंत्राटदारांना रक्कम दिली. त्यामुळे ग्राम विकास विभागाला रु. २८ कोटी ६३ लाखांचे नुकसान सोसावे लागले. याबाबतही शासनाने कोणतेच स्पष्टीकरण ‘सीएजी’ला दिलेले नाही.

डिसेंबर २०१९ मध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या अभिलेख छाननीत असे आढळून आले की, सन २०१७-१८च्या आर्थिक वर्षात करपात्र उत्पन्नाचे चुकीचे अंदाज वर्तवल्यामुळे आयकर विभागाला रु. ४१ कोटी १९ लाखांचा कर भरण्याऐवजी केवळ रु. १४ कोटी ९० लाखांच्या कराचा भरणा करण्यात आला. त्यामुळे महामंडळाने चुकविलेल्या करावर रु. २ कोटी ३८ लाखांचा दंड आयकर विभागाकडे भरावा लागला. हे चुकीच्या आर्थिक व्यवस्थापनाचे निर्देशकच म्हणायला हवे.

राज्य शासन सहकारी संस्था व महामंडळांच्या रुपाने पांढरे हत्ती पोसत आहे अशी अनेक वेळा टीका होताना दिसते, त्याची उदाहरणे आपल्याला या अहवालात सापडतात. सामाजिक न्याय विभागाने १३ सहकारी सूत गिरण्यांना जुलै १९९८ ते मार्च २०२१ या कालावधीत रु. २७५ कोटी ७८ लाखांचे दीर्घ मुदतीचे कर्ज दिले होते. परंतु त्यापैकी ५ सूत गिरण्या सुरूच झाल्या नव्हत्या. तर सर्व सूत गिरण्यांकडून रुपये १९५ कोटी ८८ लाख कर्जाची वसुली होणे गरजेचे असताना त्यापैकी एका सूत गिरणीकडून फक्त रु. १ कोटी १० लाखांची वसुली झाली होती. यावरून दिलेल्या कर्जाचा सहकारी सूत गिरण्यांकडून वेळेवर परतावाच होत नाही हे निदर्शनास येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही शासनाची नावाजलेली संस्था आहे. परंतु या संस्थेने राबविलेल्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची छाननी केली असता या संस्थेतही अलबेल नाही हेच दिसून आले. जुलै, २०१९ मध्ये ‘बार्टी’ने ‘अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा’, १९८९ बाबत जाणीव-जागृती निर्माण करण्यासाठी, समाजातील जातीभेद नष्ट करण्यासाठी तसेच सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध योजनांचे लाभार्थी शोधण्यासाठी **‘समता दूत’** प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ‘सी-डॅक’ या सॉफ्टवेअर कंपनीच्या मदतीने सॉफ्टवेअर व मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले गेले. सदर कामासाठी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नेमण्यात आले. त्यांना सर्वेक्षण करता यावे म्हणून ७०० भ्रमणध्वनी संच खरेदी केले गेले. मात्र काही कालावधी नंतर ‘सी-डॅक’ने यासाठी लागणारे सांकेतांक (Source Code) देणे बंद केले. त्यामुळे सर्वे फॉर्म भरताना मोबाईल ॲप्लिकेशन वापरणे बंद झाले व मोबाईल पडून राहिले. परंतु ‘सी-डॅक’ कडून सांकेतांक मिळवण्यासाठी मधल्या काळात ‘बार्टी’च्या अधिकाऱ्यांनी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. या ढिसाळ कार्यपद्धतीमुळे ॲप्लिकेशन, सॉफ्टवेअर व मोबाईलवर केलेला खर्च वाया गेला. एका चांगल्या

प्रकल्पाचे 'बार्टी'च्या अधिकाऱ्याकडून नियोजन, समन्वय व सनियंत्रण न झाल्यामुळे प्रकल्प गुंडाळून ठेवावा लागला.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (MHADA) मार्च, २०१६ मध्ये रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर इथे झोपडपट्टीत राहणाऱ्या जनतेसाठी **'बहुद्देशीय केंद्र'** बांधले. त्यामध्ये मूलभूत सोयी-सुविधांचा समावेश होता. या संपूर्ण प्रकल्पावर रु. ५ कोटी ७१ लाख खर्च करण्यात आले. मात्र दप्तर-दिरंगाई व शासकीय अधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे करारनामा होऊ शकला नाही, या प्रकल्पाला भोगवटा प्रमाणपत्र मिळू शकले नाही. त्यामुळे गोर-गरिबांना उपयोगी पडणारे हे बहुद्देशीय केंद्र डिसेंबर, २०२१ पर्यंत म्हणजे ५ वर्षापेक्षा अधिक काळ कोणत्याही उपयोगाविना तसेच पडून होते.

ऑगस्ट, २०१६ मध्ये मृद् व जलसंधारण विभागाने रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यात 'पहुर' या ठिकाणी १५ कोटी २० लाख रुपये खर्चून धरण बांधले. मात्र ४.२२ किमीच्या कालव्यासाठी भूसंपादन न केल्यामुळे व त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून मुंबई-दिल्ली औद्योगिक कॉरिडॉरसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू होऊन; त्यांनी भूसंपादन केल्यामुळे मृद् व जलसंधारण विभागाने सिंचनासाठी केलेला सर्व खर्च वाया गेला. विभागाने ११७ हेक्टर जमीन सिंचित करण्याचे जे उद्दिष्ट होते ते पूर्णच होऊ शकलेले नाही. त्यामुळे या योजनेतही शासनाला अपयश आले. अशा अनेक प्रकरणांचा पाढा 'सीएजी'ने या अहवालात वाचला आहे.

आपण आपल्या कुटुंबात जसे काटकसरीने, कार्यक्षमपणे, प्रभावीपणे आर्थिक खर्चाचे व्यवस्थापन करीत असतो, त्याचप्रमाणे २ कोटी ४८ लाख कुटुंब संख्या असणाऱ्या या महाराष्ट्र राज्याचा गाडा हाकताना विविध योजना, कार्यक्रम याची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे, आर्थिक व्यवस्थापन काटेकोरपणे करणे, प्राधान्याच्या कामांचे क्रम ठरवणे गरजेचे असते. ते वरील प्रकरणांवरून होताना दिसत नाही. आज सीएजी सारखी संस्था राज्य सरकार राबवत असलेल्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे का? राज्यात राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमांची फलनिष्पत्ती काय आहे. त्याचा आरसा दाखवण्याचे काम करीत आहे. लेखापरीक्षणातील महत्त्वाची निरीक्षणे व निष्कर्ष राज्य विधिमंडळाच्या निदर्शनास आणून देणे हा मुख्य उद्देश 'सीएजी'चा राहिला आहे. जेणे करून राज्याचे कार्यकारी प्रमुख, मंत्री गण यांना आपल्या प्रशासनात सुधारणा करण्यास वाव मिळेल, धोरण ठरविताना अधिकाऱ्यांना निर्देश देण्यास मदत होईल, विधिमंडळात विरोधी पक्षामार्फत यावर प्रभावी चर्चा घडून येईल. ज्यामुळे राज्यातील विविध शासकीय, निमशासकीय संस्था व उपक्रम यांच्या आर्थिक व्यवस्थापनात सुधारणा घडून येईल, आणि खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्य निर्मितीस चालना मिळेल. मात्र आज हे होताना दिसत नाही. बऱ्याच वेळा सरकारकडून अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सीएजीचे अहवाल

विधिमंडळात पटलावर ठेवले जातात. यावर चर्चाच होऊ नये हाच सत्ताधारी पक्षाचा उद्देश राहिला आहे. परंतु विरोधी पक्षही सरकारच्या या कृती विरोधात सभागृहात व सभागृहाबाहेर आवाज उठवताना दिसत नाही.

'सीएजी' दरवर्षी राज्याचे आर्थिक क्षेत्र, वित्त व्यवस्था, महसुली क्षेत्र, सामान्य आणि सामाजिक सेवा, स्थानिक संस्था, विविध विषयावरील विशेष अहवाल तसेच अनुपालन अहवाल सादर करीत असते. असे असताना विरोधी पक्षाला त्यावर अभ्यास करून विधिमंडळात व प्रसारमाध्यमात प्रभावी चर्चा घडवून आणण्याची संधी असते. मात्र आज तसे होताना दिसत नाही. त्यामुळे एखाद्या मोठ्या घोटाळ्यावर सीएजीने अहवाल सादर केला, सरकारला अडचणीत आणता येईल असे वाटले तर आणि तरच प्रसारमाध्यमात चर्चा झडते, नाहीतर नेहमीप्रमाणे एकमुखाने सीएजीच्या अहवालांना सरळ केराची टोपली दाखवली जाते हे वास्तव आहे.

महालेखापरीक्षक व त्यांनी सादर केलेले अहवाल हे सरकारचे मार्गदर्शक, अभ्यासक व तत्त्वज्ञानी मित्र ठरू शकतात जर सरकारने या संस्थेचा प्रभावी उपयोग केला तर. परंतु आज सरकारच्या ध्येय-धोरणात व आर्थिक व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्याची क्षमता असलेले 'सीएजी' सारखे महत्त्वाचे साधन आज दुर्लक्षित राहिले आहे. हे महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेचे मोठे दुर्दैवच म्हणावे लागेल.

सदर वार्तापत्रातील माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू. प्रकाशन अधिक माहितीपूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे. 'समर्थन' प्रकाशित करीत असलेल्या माहितीबाबत अधिक जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थ तज्ज्ञ, विषय तज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी 'समर्थन' स्वीकारीत आहे.

धन्यवाद.

**संपर्क व प्रतिक्रिया:** ———————————————————————
———————————————————————————
———————————————————————————
———————————————————————————
———————————————————————————

# ।। अनुक्रमणिका ।।


| अक्र | प्रकरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | १० |
| २. | महाराष्ट्रात 'राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियानातील' अंमलबजावणीत अनेक त्रुटी | ११ |
| ३. | मुंबईतील मंडईंमध्ये वाढलेला गैरव्यवहार व पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित | १७ |
| ४. | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका मलनि:स्सारण व्यवस्था | २० |
| ५. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा मर्जीतल्या कंत्राटदारांवर मेहरनजर | २२ |
| ६. | मुंबई महानगरपालिकेला मालमत्ता कराच्या चुकीच्या आकारणीमुळे दंड! | २४ |
| ७. | ग्रामीण विकास विभागाकडून रस्त्यांच्या कामात कंत्राटदारांना अतिरिक्त प्रदान | २५ |
| ८. | अपूर्ण जलविद्युत प्रकल्पामुळे निधीची अडवणूक | २५ |
| ९. | सहकारी सूत गिरण्यांकडून कर्ज वसुली थकली | २६ |
| १०. | 'बार्टी' कडून समाज प्रबोधनासाठी केलेला खर्च वाया | २९ |
| ११. | म्हाडाने घाटकोपरमध्ये बांधलेले 'बहुद्देशीय केंद्र' उपयोगाविना पडून | ३१ |
| १२. | महाराष्ट्र राज्य वखार मंडळाने कराचे चुकीचे अंदाज लावल्याने आयकर विभागाकडून दंड! | ३२ |
| १३. | मृद् व जलसंधारण विभागाला जमीन संपादनात अपयश आल्याने धरण बांधण्याचा खर्च वाया गेला | ३३ |

## १. प्रास्ताविकः

दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठीचा हा अनुपालन अहवाल भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १५१ अंतर्गत, महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. हा अहवाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५१ (२) अंतर्गत राज्य विधान मंडळासमोर सादर करणे आवश्यक असते. त्यानुसार तो राज्य विधिमंडळाच्या मार्च, २०२२ मध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सादर करण्यात आला. या अहवालाचा कालावधी वर्ष २०१९-२० ते २०२०-२१ या दोन वर्षांचा असून यामध्ये राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियान, महानगरपालिकेच्या मंडईंचा वापर आणि पुनर्विकास, नगर विकास विभागाकडून झालेला निष्फळ खर्च आणि कंत्राटदारांना करून दिलेला फायदा, मालमत्ता कराची कमी आकारणी, ग्रामीण विकास विभागाने कंत्राटदारांना दिलेल्या अतिरिक्त रकमा, जलसंपदा विभागाकडून निधीची केली गेलेली अडवणूक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून विविध संस्थांना दिलेल्या थकीत कर्जाची न झालेली वसूली, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने केलेले टाळता येण्याजोगे निष्फळ खर्च आणि त्यांची केलेली प्रदाने तसेच मृद् व जलसंधारण विभागाकडून झालेला निष्फळ खर्च याबाबत महालेखापरीक्षकांनी नोंदविलेली निरीक्षणे, काढलेले निष्कर्ष, केलेल्या शिफरशी व शासनाच्या विभागांनी-प्राधिकरणांनी दिलेली स्पष्टिकरणे या सर्व घटनांचा आढावा या वार्तापत्रात घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाचे ३३ विभाग असून १७ स्वायत्त संस्था आणि ३८ सार्वजनिक उपक्रम आहेत. ज्यांचे प्रमुख अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव असून त्यांची लेखापरीक्षा प्रधान महालेखाकार, महाराष्ट्र, मुंबई यांच्याद्वारे केली जाते. लेखापरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट केलेल्या ३१ परिच्छेद आणि आढाव्यासंदर्भात स्पष्टीकरणात्मक ज्ञापने ३ महिने ते ७८ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रलंबित होती. इतक्या मोठ्या कालावधीसाठी शासनाने केलेल्या आर्थिक व्यवहाराबाबत स्पष्टीकरण न देणे ही अतिशय गंभीर बाब आहे.

लेखापरीक्षकांचे महत्त्वाचे निष्कर्ष व त्यांनी शासनाला केलेल्या महत्त्वपूर्ण शिफारशी वाचक, सजग नागरिक, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी व अभ्यासकांपुढे आणून देणे हा अहवालाचा मूळ हेतू आहे. त्याच प्रमाणे प्रशासनात सुधारणा व्हावी, धोरण आखताना त्यासंबंधी निर्देश देताना मंत्रिमंडळाला सहाय्यभूत ठरावे हा त्या मागचा मुख्य उद्देश आहे. जेणे करून शासकीय संस्थांना त्यांच्या कार्यात तसेच आर्थिक व्यवस्थापनात सुधारणा करता येईल व शासनाच्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकता निर्माण होऊ शकेल व भ्रष्टाचाराविरोधात सर्वसामान्यांचा आवाज अधिक बळकट कसा होईल या सर्व बाबींचा उहापोह या वार्तापत्रात केलेला आहे. मागील वार्तापत्राप्रमाणे याही वार्तापत्राला चांगला प्रतिसाद द्याल ही अपेक्षा आहे.

## २. महाराष्ट्रात 'राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियाना'ची अंमलबजावणी संथ व प्रभावशून्य - भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

- सप्टेंबर २०१३ मध्ये 'राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियाना'च्या दस्तऐवजानुसार शासनाने दोन वर्षांच्या आत राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे 'राज्य उच्च शिक्षण परिषदे'चे गठण करणे आवश्यक होते. 'राज्य उच्च शिक्षण परिषद' ही संस्था राज्यातील उच्च शिक्षणासाठी व्यापक, दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक उच्च शिक्षणाचा आराखडा विकसित करणार होती. तसेच ती उच्च शिक्षणाबाबत केंद्र सरकारच्या 'उच्च स्तर शिक्षा अभियान' व राज्य सरकार यामधील समन्वय साधण्याचे कार्य देखील करणार होती. तसेच उच्च शिक्षणाविषयी काम करणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करण्याची जबाबदारी या संस्थेवर होती. मात्र राज्य शासनाकडून ही संस्था डिसेंबर, २०१६ मध्ये गठित करण्यात आली व ऑगस्ट, २०१७ मध्ये प्रत्यक्ष कार्यान्वयीत झाली. याचाच अर्थ उच्च शिक्षणात केंद्र शासनाने केलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीत राज्य शासनाला २१ महिन्यांचा विलंब झाला.

- राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियानाच्या निर्देशानुसार या अभियानात प्रत्येक सहभागी राज्याने दहा वर्षांसाठी धोरणात्मक आराखडा तयार करायचा होता, ज्याचा आढावा पुढील ५ वर्षांत घेतला जाणार होता. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, महाराष्ट्र शासनाने दहा वर्षांचा धोरणात्मक आराखडाच तयार केला नव्हता. त्यामुळे राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण अभियानाकडून मिळणाऱ्या महत्त्वाच्या लाभांपासून वंचित रहावे लागले. याबाबत स्पष्टीकरण मागितले असता प्रशासकीय दिरंगाई झाल्याचे सांगण्यात आले.

- राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीसाठी ६०:४०च्या विभागणी प्रमाणे केंद्र शासनाने राज्य शासनाला सन २०१५-१६ ते २०२०-२१ या ६ वर्षांच्या कालावधीसाठी रु. २२६ कोटी १८ लाखांचा निधी दिला तर राज्य शासनाने स्वत:चा रु. १५० कोटी ३९ लाखांचा निधी दिला. त्यापैकी रु. २८३ कोटी ७ लाखांचा निधी खर्च करण्यात आला तर रु. ९३ कोटी ९० लाखांचा निधी अखर्चित राहिला.

- 'राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियाना'साठी पात्र ठरण्यासाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस स्थूल राज्य उत्पन्नाच्या २ टक्के रक्कम ही उच्च शिक्षणावर खर्च करणे अपेक्षित होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने मे २०१८ मध्ये 'मानव संसाधन विकास मंत्रालया'सोबत केलेल्या सामंजस्य करारानुसार मार्च, २०२०च्या अखेरपर्यंत ठरल्याप्रमाणे किमान स्थूल राज्य उत्पन्नाच्या २ टक्के रक्कम खर्च केली जाईल असे म्हटले होते. मात्र लेखापरीक्षणात असे आढळून आले की, सन २०२०-२१मध्ये प्रत्यक्षात केवळ ०.३१ टक्के रक्कम खर्च करण्यात आली. आणि उच्च

शिक्षणावर होणारा खर्च वाढण्याऐवजी त्यात आणखी घट झाल्याचे आढळून आले. शासनाने उच्च शिक्षणावर कमी खर्च का केला याचे कोणतेही कारण दिलेले नाही.

☞ भारत सरकारकडून प्राप्त झालेला निधी राज्य शासनाने स्वत:च्या हिश्श्यांसह राज्य प्रकल्प संचालनालयाला १५ दिवसात वितरीत करायचा होता. आणि राज्य प्रकल्प संचालनालयाकडे निधी आल्यानंतर तो सर्व निधी सर्व शैक्षणिक संस्थांना १५ दिवसांच्या आत वितरीत करायचा होता. मात्र राज्य शासनाने राज्य प्रकल्प संचालनालयाला रु. ३७६.९७ कोटींच्या निधीपैकी रु. ३६५.४७ कोटी (९७%) निधी वितरीत करण्यास ११ ते २९३ दिवसांचा विलंब केला.

☞ राज्य शासनाकडून राज्य प्रकल्प संचालनालयाला प्राप्त झालेल्या रु. ३७६.९७ कोटी निधीपैकी रु. २४५.५६ कोटींचा (५६%) निधी सहभागी उच्च शैक्षणिक संस्थांना वितरीत करण्यासाठी १० ते १३७ दिवसांचा विलंब केला होता.

☞ राज्य शासनाने याबाबत स्पष्टीकरण देताना अर्थसंकल्प वितरण प्रणालीमध्ये निधी उशीराने जमा होणे, तसेच कोविड-१९ अशी कारणे दिली. जी अजिबात पटण्यासारखी नव्हती.

☞ राज्य शासनाने केंद्र शासनाचा ६०% हिस्सा जमा झाल्यानंतर स्वत:चा ४०% हिस्सा देणे गरजेचे होते मात्र राज्य शासनाने अर्थसंकल्पात अपुरी तरतूद केल्याने राज्यातील उच्च शिक्षण संस्थांना निधी वितरीत करण्यासाठी २९३ दिवसाचा विलंब केला.

☞ राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राष्ट्रीय शिक्षा अभियानाचा निधी राज्य उच्च शिक्षण परिषद आणि उपभोक्ता संस्था यांनी फक्त एकच बचत खाते शेड्युल बँकेत वा राष्ट्रीयकृत बँकेत ठेवणे गरजेचे होते. असे असताना २४ पैकी ४ उच्च शिक्षण संस्थांनी ज्यामध्ये शिवाजी विद्यापीठ; कोल्हापूर, मुंबई विद्यापीठ; मुंबई, राजाराम महाविद्यालय; कोल्हापूर, छत्रपती शाहू वाणिज्य शिक्षण आणि संशोधन संस्था; कोल्हापूर यांनी उच्च शिक्षणासाठी प्राप्त झालेली रक्कम चालू बँक खाते (Current Account), मुदत ठेवी खाते (Fixed Deposit) यामध्ये ठेवली होती. त्यामुळे अभियानाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला गेला. डिसेंबर २०२१ मध्ये स्पष्टीकरणात्मक उत्तरात राज्य शासनाने सांगितले की, वरील चारही संस्थांना समज दिली असून त्यांना अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यास सांगितले आहे. यावरून राज्य प्रकल्प संचालनालयाचे आर्थिक व्यवस्थापन व नियंत्रण याचा मोठा अभाव असल्याचे दिसून येते.

☞ उच्च शिक्षणातील गुणवत्ता आणि उत्कृष्टता सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक म्हणजे उच्च शिक्षण संस्थांमध्ये पुरेशा प्रमाणात चांगल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची उपलब्धता असणे गरजेचे आहे. त्यानुसार प्रत्येक संस्थेत शिक्षकांच्या मनुष्यबळाच्या मंजूर पदांपैकी ८५% पदे भरलेली

असावित आणि उरलेली रिक्त पदे टप्प्या-टप्प्यांनी भरणे आवश्यक होते. मात्र तपासणी केलेल्या २१ पैकी १८ उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये ज्यांची शिक्षक/अध्यापक कर्मचाऱ्यांची माहिती उपलब्ध होती. केलेल्या लेखापरीक्षणात असे आढळून आले की, अध्यापन कर्मचाऱ्यांच्या मनुष्यबळात २३ ते ७८% पदे रिक्त होती. म्हणजेच ही महाविद्यालये राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियानाची मार्गदर्शक सूचनांचे निकष पूर्ण करण्यात अपयशी ठरली होती. शिक्षकांच्या रिक्त पदांचे कारण विचारले असता त्याला दिलेल्या उत्तरात शिक्षकांच्या नियुक्तीसाठी सादर केलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रतिसाद दिला नाही असे म्हटले आहे.

## २.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी:

- ☞ *केंद्र शासनाबरोबर झालेल्या सामंजस्य करारानुसार राज्य शासनाने उच्च शिक्षणावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या किमान २% खर्च करावा.*
- ☞ *राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियानांतर्गत उच्च शिक्षणात प्रगती साधण्यासाठी प्रकल्प कालबद्ध रीतीने पूर्ण करावेत, त्यात कोणतीही हयगय करू नये.*
- ☞ *राज्यात उच्च शिक्षणाच्या उत्तम सनियंत्रण आणि मूल्यांकन यासाठी प्रमुख कामगिरी निर्देशक कालमर्यादेत तयार करावेत.*

## २.२ 'उच्च शिक्षा अभियाना'साठी केंद्राकडून आलेल्या निधीचे शैक्षणिक संस्थांना वाटप करण्यास १३ ते २९३ दिवसांचा विलंब!

**सहभागी शैक्षणिक संस्थांना निधी देण्यात विलंब कालावधी:**

तक्ता क्र.१ *(रु. कोटीत)*

| वर्ष | केंद्र हिस्सा रक्कम | राज्य हिस्सा रक्कम | राज्य शासन स्तरावर झालेला विलंब दिवस | राज्य प्रकल्प संचालनालय स्तरावरील विलंब दिवस | एकूण विलंब दिवस |
|---|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | ३४.५० | २३.०० | ५५ ते १६६ | ० ते ७० | ६५ ते २२४ |
| २०१६-१७ | १.८० | १.२० | ५५ | १० | ६५ |
| २०१७-१८ | ५७ | ३८.०० | १२ ते २९३ | ० ते १३७ | १३ ते २९३ |
| २०१८-१९ | ४५.१८ | ३०.१२ | ० ते ६३ | ० ते ७६ | ० ते ९२ |
| २०१९-२० | ८७.७० | ५८.४७ | ५५ ते २५० | ० ते ४७ | ४७ ते २५५ |
| एकूण | २२६.१८ | १५०.७९ | ० ते २९३ | ० ते १३७ | १३ ते २९३ |

- ☞ वर्ष २०१५-१६ ते २०१९-२० या ५ वर्षांच्या कालावधीत राज्यातील उच्च शिक्षणाच्या विकासासाठी रु. २२६ कोटी १८ लाखांचा निधी केंद्र शासनाने राज्य शासनाला दिला. त्यामध्ये राज्य शासनाने स्वत:चा हिस्सा म्हणून रु. १५० कोटी ७९ लाखांचा निधी दिला.
- ☞ केंद्र शासनाने राज्य शासनाला निधी दिल्यानंतर १५ दिवसाच्या आत तो निधी राज्य प्रकल्प संचालनालयाला देणे अपेक्षित असताना राज्याने त्यासाठी किमान १३ ते २९३ दिवसांचा विलंब केला.
- ☞ राज्य शासनाकडून राज्य प्रकल्प संचालनालयाला निधी प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत तो शिक्षण संस्थांकडे वळता करणे आवश्यक असताना त्यासाठी जवळपास १ ते १३७ दिवसांचा विलंब केला होता.
- ☞ शिक्षण संस्थांना निधी मिळण्यासाठीचा विलंब कालावधी ११ ते २९३ दिवस इतका मोठा होता.

## २.३ राज्यात राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानासाठी निवडलेल्या २४ शिक्षण संस्थांमधील ६६० शिक्षकांची पदे रिक्त

**मुंबई विद्यापीठ, निर्मला निकेतन व दक्षिण भारतीय शिक्षण संस्थेने शिक्षक पदांची माहितीच दिली नाही.**

### निवडलेल्या उच्च शिक्षण संस्थांमधील शिक्षकांच्या पदांची माहिती:

**तक्ता क्र. २**

| अक्र. | संस्थेचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | रिक्त पदे (%) |
|---|---|---|---|---|---|
| १. | इस्माईल युसुफ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मुंबई. | ७१ | ४२ | २९ | ४०.८५ |
| २. | मुंबई विद्यापीठ. | उ. ना. | उ.ना. | उ.ना. | ०.०० |
| ३. | सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे. | ३८६ | १८८ | १९८ | ५१.३० |
| ४. | निर्मला निकेतन गृह विज्ञान महाविद्यालय, मुंबई. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ०.०० |
| ५. | जय हिंद महाविद्यालय, मुंबई. | ६३ | ४६ | १७ | २६.९८ |
| ६. | दक्षिण भारतीय शिक्षण संस्था कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ०.०० |
| ७. | धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा. | १८ | १६ | २ | ११.११ |
| ८. | यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा. | १०६ | ७१ | ३६ | ३३.९६ |
| ९. | सोफीया महिला महाविद्यालय, मुंबई. | ५१ | ३३ | १८ | ३५.२९ |
| १०. | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे. | १३५ | ९९ | ३६ | २६.६७ |
| ११. | कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर | ३५ | १७ | १८ | ५१.४३ |
| १२. | अण्णासाहेब वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ओतूर, पुणे. | ४२ | ३० | १२ | २८.५७ |

| अक्र. | संस्थेचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | रिक्त पदे (%) |
|---|---|---|---|---|---|
| १३. | विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर. | ८८ | ४५ | ४३ | ४८.८६ |
| १४. | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांजा, रत्नागिरी. | ३३ | २५ | ८ | २४.२४ |
| १५. | रामनारायण रुईया महविद्यालय, मुंबई. | ८९ | ६८ | २१ | २३.६० |
| १६. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | २६२ | १३४ | १२८ | ४८.८५ |
| १७. | लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव. | १५ | १५ | ० | ०.०० |
| १८. | नगीनदास खांडवाला वाणिज्य, कला, आणि व्यवस्थापन महाविद्यालय, मुंबई. | ३० | २३ | ७ | २३.३३ |
| १९. | सेंट फ्रान्सिस डी-सालेस महाविद्यालय, नागपूर. | ४३ | २४ | १९ | ४४.१९ |
| २०. | ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, परभणी. | ६२ | ३९ | २३ | ३७.१० |
| २१. | शासकीय अध्यापन महाविद्यालय, परभणी. | ७ | ७ | ० | ०.०० |
| २२. | मॉडेल पदवी महाविद्यालय, गडचिरोली. | १४ | ९ | ५ | ३५.७१ |
| २३. | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर. | ६२ | ४३ | १९ | ३०.६५ |
| २४. | छत्रपती शाहू व्यवसाय शिक्षण आणि संशोधन संस्था, कोल्हापूर. | २७ | ६ | २१ | ७७.७८ |
| एकूण | | १,६३९ | ९८० | ६६० | ४०.२७ |

☞ महाराष्ट्रात ‘राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियाना’ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील उच्च शिक्षण देणाऱ्या २४ संस्था निवडण्यात आल्या होत्या, त्यामध्ये ४ विद्यापीठे, १८ महाविद्यालये व २ शिक्षण संस्थांचा समावेश.

☞ महाराष्ट्रात ‘राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियाना’ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील उच्च शिक्षण देणाऱ्या २४ संस्थांपैकी २१ संस्थांमध्ये शिक्षक कर्मचाऱ्यांची १ हजार ६३९ पदे मंजूर होती. त्यापैकी ९८० पदे भरण्यात आली होती, तर ६६० पदे रिक्त होती. या सर्व संस्थांमधून रिक्त पदांचे प्रमाण ४०.२७% इतके मोठे.

☞ मुंबई विद्यापीठ, निर्मला निकेतन गृह विज्ञान महाविद्यालय, मुंबई व जय हिंद महाविद्यालय, मुंबई या संस्थांनी लेखापरीक्षणासाठी आपल्याकडील शिक्षक कर्मचारी पदांची मंजूर, भरलेली आणि रिक्त पदांची यादीच दिली नाही.

☞ सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, १९८ (५१%) व छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, कोल्हापूर, १२८ (४९%) या दोन विद्यापीठात शिक्षक कर्मचाऱ्यांची सर्वात जास्त पदे रिक्त होती.

☞ लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव व शासकीय अध्यापन महाविद्यालय, परभणी यांनी १००% पदे भरली होती.

## २.४ ‘राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियाना’त पात्र ठरण्यासाठी महाराष्ट्राला स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत खर्चाची अट २ टक्क्यांची; परंतु प्रत्यक्ष खर्च केवळ ०.३२ टक्केच.

**वर्ष २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीत उच्च शिक्षणावर झालेला खर्च**

तक्ता क्र. ३ *(रु. कोटीत)*

| वर्ष | सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न | सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्नाच्या दोन टक्के | उच्च आणि तंत्र शिक्षणावरील प्रत्यक्ष खर्च | उच्च व तंत्र शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | १९,८६,७२१ | ३९,७३४ | ७,३६१.६९ | ०.३७ |
| २०१६-१७ | २१,८८,५३२ | ४३,७७१ | ७,१९७.८४ | ०.३२ |
| २०१७-१८ | २३,८२,५७० | ४७,६५१ | ७,४८४.६१ | ०.३१ |
| २०१८-१९ | २५,७९,६२८ | ५१,५९३ | ७,७७७.५४ | ०.३० |
| २०१९-२० | २८,१८,५५५ | ५६,३७१ | ८,१५२.९५ | ०.२८ |
| २०२०-२१ | २५,६१,६२९ | ५३,२३३ | ८,२५४.२९ | ०.३१ |
| **सरासरी खर्च** | **२४,१९,६०६** | **४८,७२५** | **७,७०४.८२** | **०.३२** |

*(स्रोत: महाराष्ट्र शासनाचे अर्थसंकल्पीय अंदाज)*

☞ वर्ष २०१५-१६ ते २०२०-२१ या ६ वर्षांच्या कालावधीत सरासरी स्थूल राज्य उत्पन्न रु. २४ लाख १९ हजार ६०६ कोटी इतके होते. त्यापैकी उच्च शिक्षणावर रु. ४८ हजार ७२५ (२%) कोटी खर्च होणे अपेक्षित होते. परंतु त्यापैकी केवळ रु. ७ हजार ७०४ कोटी ८२ लाख इतकाच निधी खर्च झाला. निधी खर्च होण्याचे प्रमाण फक्त ०.३२% इतके कमी होते.

☞ वर्ष २०१५-१६ मध्ये राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न रु. १९ लाख ८६ हजार ७२१ कोटी इतके होते. त्यापैकी रु. ३९ हजार ७३४ (२%) कोटींचा निधी उच्च शिक्षणावर खर्च होणे अपेक्षित होते. परंतु फक्त रु. ७ हजार ३६१ कोटी ६९ लाखांचाच निधी खर्च झाला. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत खर्चाचे हे प्रमाण ०.३७% होते. जे मागील ५ वर्षात सर्वात जास्त होते.

☞ वर्ष २०१५-१६ ते २०२०-२१ या ६ वर्षात स्थूल राज्य उत्पन्न ३४% ने वाढले, मात्र उच्च व तंत्र शिक्षणावर होणारा खर्च केवळ १२%ने वाढला आहे.

☞ शासनाने उच्च शिक्षणावरील खर्चाच्या घटत्या प्रमाणाचे कुठलेही कारण दिलेले नाही. परंतु महालेखापरीक्षकांना डिसेंबर, २०२१मध्ये दिलेल्या उत्तरात असे सांगितले की, उच्च शिक्षणावर अधिक प्रमाणात खर्च करण्याचा प्रयत्न शासन करेल.

*महाराष्ट्रात 'राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियाना'ची अंमलबजावणी संथ आणि अप्रभावी नियंत्रणाने व्यापलेली होती. केंद्र आणि राज्य शासन मिळून एकूण रुपये ३७६ कोटी ९७ लाख खर्च करणे गरजेचे असताना राज्य शासन फक्त रुपये २८३ कोटी ७ लाख खर्च करू शकले. तर रुपये ९३ कोटी अखर्चित राहिले. राज्यात 'राज्य उच्च शिक्षण परिषदेची', स्थापना ऑक्टोबर, २०१३ पर्यंत करायची होती परंतु राज्य शासनाच्या दप्तर दिरंगाईमुळे तिचे गठण ऑगस्ट २०१७ मध्ये झाले. त्याचप्रमाणे राज्य 'उच्च शिक्षण परिषदे'कडून सहभागी उच्च शिक्षण संस्थांची कामगिरी तपासण्यात परिषद अपयशी ठरली असल्याची बाब लेखापरीक्षणात निदर्शनास आली.*

## ३. अधिकारी-व्यापाऱ्यांच्या संगनमताने मंडईचा अनधिकृत वापर वाढला! परंतु पुनर्विकास मात्र रखडला!

**भ्रष्ट सहाय्यक अभियंता (बाजार) यांच्याकडून अनाधिकृत व्यापाऱ्यांना अभय!**

☞ बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम ६१(ह) अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका फळे, भाजीपाला, मांस इत्यादीच्या विक्रीसाठी सार्वजनिक मंडईंचे बांधकाम, देखरेख आणि नियमन करते. फेब्रुवारी, २०२१ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे १९५ सार्वजनिक वापराच्या मंडई होत्या. त्यांचा पुनर्विकास व वापराबाबत जानेवारी ते फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत लेखापरीक्षण केले असता पुढील बाबी निदर्शनास आल्या.

☞ ***१०३ मंडयांपैकी ९ मंडयांचे व्यवस्थापन आणि देखभालीचे काम खाजगी अभिकरणांना भाडेतत्त्वावर देण्यात आले होते. त्यापैकी ३ मंडईंची तपासणी केली असता —***

१) कोपरी, पवई येथील भाडेतत्त्वावरील करारानुसार मंडई शेतीमाल विक्रीसाठीचे १०% क्षेत्र राखीव ठेवण्यात आले नव्हते. मंडई अनधिकृत बांधकामे केली होती. त्यामुळे अतिरिक्त महापालिका आयुक्त, पूर्व उपनगरे यांनी तो करार रद्द केला व भाडेपट्टेदाराला जागा खाली करण्याचे निर्देश दिले तरीही त्याने जागा रिकामी केली नव्हती. ऑगस्ट २०१७ मध्ये याच मंडईमध्ये एक मद्याचा बार आणि एक मद्य पुरवणारे हॉटेल सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्याबाबत सहाय्यक आयुक्त (बाजार) यांनी पोलीस संरक्षणात जागेचा जबरदस्तीने ताबा घेण्याचे निर्देश दिले असता सहाय्यक अभियंता (बाजार) यांनी केलेल्या कारवाईचे अभिलेख लेखापरीक्षणासाठी उपलब्ध नव्हते. त्यामुळे या भाडेपट्टेदारावर कारवाई केली किंवा नाही हेच

कळले नाही. तसेच त्या जागेचा वापर भाडेपट्टेदाराने फेब्रुवारी २०२१ मध्येही तसाच सुरूच ठेवला असल्याचे निदर्शनास आले. याबाबतच्या उत्तरात महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने डिसेंबर २०२१ मध्ये सांगितले की, समाप्ती पत्राला भाडेपट्टेदाराने न्यायालयात आव्हान दिले आहे.

२) कोंडीविटा, अंधेरी येथील मंडईमध्ये महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय पार्टी व उपहारगृहासाठी गच्चीचा वापर सुरू होता. तर मोकळ्या जागेत उद्वाहनाची उभारणी केली होती. तसेच शेती मालाच्या विक्रीसाठीची १०% जागा आरक्षित ठेवली गेली नव्हती. याबाबत भाडेपट्टेदाराकडून रु. ३.२५ लाखांची दंड वसुली करण्यात आली. मात्र असे असूनही या भाडेपट्टेदाराचा कारभार तसाच चालू होता. त्यानंतर जानेवारी २०२१च्या केलेल्या पाहणीत या मंडईचा दुसरा मजला बँक्वेट हॉल म्हणून वापरला जात असल्याचे आढळून आले. त्याबाबत डिसेंबर, २०२१ रोजीच्या उत्तरात नगर विकास विभागाने सांगितले की, भाडेपट्टेदारावर दंड आकारण्यात आला आणि त्याने केलेल्या संबंधित उल्लंघनात सुधारणा करण्यात आली असून सर्व अटींची आता पूर्तता करण्यात आली आहे.

३) वालनाई, मालाड येथील मंडईमध्ये अनधिकृत कामे, फेरफार आणि भाडेपट्टा कराराचे उल्लंघन करून दुसऱ्या मजल्यावर बँक्वेट हॉल म्हणून वापर करण्यात आला होता. याबाबत सप्टेंबर, २०१४ आणि फेब्रुवारी २०१५ अशी २ वेळा नोटीस देण्यात आली. त्यानंतर सप्टेंबर, २०१७ रोजी भाडेपट्टा समाप्तीचे पत्र देण्यात आले. परंतु जानेवारी, २०२१च्या लेखापरीक्षणात असे आढळून आले की, जागेचा ताबा भाडेपट्टेदाराकडे कायम होता. डिसेंबर, २०२१ रोजीच्या उत्तरात विभागाने असे सांगितले की, भाडेपट्टेधारकाने केलेली अनधिकृत कामे काढून टाकण्यात आलेली आहेत. तसेच भाडेपट्टेधारकाने नोटीस रद्द करण्याची व भाडे स्वीकारण्याची विनंती केलेली आहे. ज्यावर सध्या प्रक्रिया सुरू आहे.

## ३.९ मुंबईतील मंडईंचा पुनर्विकास रखडलेला!

☞ पुनर्विकासासाठी घेतलेल्या ३० पैकी २३ मंडईंचा अभिलेख्याची तपासणी केली असता असे आढळून आले की, गेल्या १५ वर्षांमध्ये केवळ ५ (२२%) मंडईंचा पुनर्विकास करण्यात आला होता. तर १८ (७८%) मंडईंचा पुनर्विकास रखडलेला होता. त्याचा त्रास त्या भागात राहणाऱ्या जनसामान्यांना सोसावा लागत होता.

## ३.२ मंडईमध्ये भाडेपट्ट्यांवर असलेल्या दुकानदारांकडून कमी शुल्क वसुली!
### भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे मुंबई महानगरपालिकेला होतेय, कोट्यवधीचे नुकसान!

☞ मालाडच्या वालनाई, मंडईमध्ये कराराचा भंग करून संपूर्ण मंडई क्षेत्राऐवजी फक्त ७०% क्षेत्रावर विक्री-केंद्र शुल्क वसूल करण्यात आले. त्यामुळे फेब्रुवारी, २००२ ते जानेवारी २०२१ या दरम्यान रु. १.४६ कोटी रुपयांची कमी वसुली झाली.

☞ गोरेगाव येथील गोकुळधाम मंडई मधील संपूर्ण पहिला मजला परवानाधारकांना देण्यात आला होता. तथापि बाजार विभागाने त्यांचे मासिक विक्री केंद्र शुल्क स्वेच्छेने कमी केले. त्यामुळे एप्रिल २००१ ते जानेवारी २०२१ या कालावधीत रु. २०.९४ लाखांची कमी वसुली झाली.

☞ १२ प्रभागांमध्ये एप्रिल, २०१७ ते डिसेंबर, २०२० या कालावधीत रु. १.८४ कोटी विक्री केंद्र शुल्काची वसुली प्रलंबित होती.

☞ वर्ष २०१७-१८ ते २०१९-२० या ३ वर्षांच्या कालावधीत पी-उत्तर (५८६) स्टॉल्स व टी प्रभागात (२२८) स्टॉल्सची संख्या कायम असताना वसुली योग्य रक्कमेत प्रत्येक वर्षात तफावत दिसत होती.

## ३.३ मागील २२ वर्षे मंडयांमधील १ हजार ४६३ चिकन / मटण दुकानांवर कचरा शुल्क आकारलेलेच नाही!

☞ वर्ष १९९९ ते डिसेंबर २०२१पर्यंत व्यवसाया संबंधित विशिष्ट कचरा शुल्काच्या वसुलीचे दस्तऐवजीकरण झालेले नसून बाजार विभागाने महानगरपालिका मंडई मध्ये स्थित १ हजार ४६३ चिकन/मटण दुकानांवर कचरा शुल्क आकारलेले नाही. त्यांच्याकडे वसुली योग्य रु. २.९१ कोटी इतकी रक्कम प्रलंबित होती.

## ३.४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

☞ *शासनाने याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला निर्देश द्यावेत. समावेशक आरक्षण योजनांतर्गत बांधलेल्या बाजारसेवांसाठीच्या मंडईंचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी पावले उचलावीत तसेच भाडेपट्टा करारातील अटींचा भंग केल्याबद्दल भाडेपट्टेदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी.*

☞ *पुनर्विकास रखडलेल्या मंडईंचा आढावा घेण्यात यावा व तो वेळेत पूर्ण होण्यासाठी त्वरित कार्यवाही सुरू करावी.*

☞ *विविध शुल्काच्या वसुलीसाठी अभिलेख योग्य पद्धतीने ठेवण्याची सुनिश्चिती करावी आणि बाजार विभागातील अंतर्गत सनियंत्रण बळकट करण्यासाठी पावले उचलावीत.*

## ४. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची करामत!

### नदीपात्रावरच मलनि:स्सारण व्यवस्थेचे विस्तारीकरण!

### काम अनधिकृत ठरल्याने; शासनाचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाया!

- ☞ केंद्र पुरस्कृत 'अटल मिशन फॉर रिज्युवेनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) योजने' अंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या भागांमध्ये मलनि:स्सारण व्यवस्थेचे विस्तारीकरण करण्याच्या योजनेसाठी रु. १४७.८४ कोटींच्या कामांना महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने ऑक्टोबर, २०१७ मध्ये मंजुरी दिली होती. हे काम हवेली तालुक्यातील चिखली, पिंपळे-निलख आणि बोपखेल येथे होणार होते. या कामासाठी रु. १४८.९९ कोटींची निविदा मंजूर करण्यात आली होती. ती कंत्राटदाराला मार्च,२०१८ रोजी रु. १५६.०७ कोटी किंमतीला दिली. त्यामध्ये रु. २२.५१ कोटी रक्कम ही मलनि:स्सारण प्रक्रिया संयंत्रासाठी होती. हे काम दोन वर्षात पूर्ण करण्यास बंधनकारक होते. मात्र सह शहर अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:स्सारण विभाग पिंपरी - चिंचवड महानगरपालिका यांच्या अभिलेख्याच्या छाननीत मार्च २०२० मध्ये आढळून आले की, नदी किनारा क्षेत्रामध्ये बांधकाम करण्यास प्रतिबंध करणारी अधिसूचना सप्टेंबर, २०१७ मध्ये केली होती. असे असताना ठेकेदाराला तेथे बांधकाम करण्याचा ठेका मार्च, २०१८ मध्ये दिला गेला. याबाबत एका स्थानिक निवासी संस्थेने मे, २०१९ मध्ये राष्ट्रीय हरित लवादाकडे तक्रार केली. त्यानंतर हरित लवादाने जानेवारी, २०२० मध्ये सदर मलनि:स्सारण प्रक्रिया सयंत्र जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले. याबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मान. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारी, २०२० मध्ये ही याचिका फेटाळून लावली. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला चिखली येथील मलनि:स्सारण प्रक्रिया संयंत्र जून, २०२० रोजी जमीनदोस्त करावे लागले.
- ☞ त्याचप्रमाणे पिंपळे-निखल येथील काम देखील मुळा नदीच्या निळ्या रेषेच्या क्षेत्रात येत असल्यामुळे थांबवावे लागले. बोपखेल येथील काम सुरू झाले नव्हते. मात्र तीनही मलनि:स्सारण प्रक्रिया संयंत्र स्थलांतरित करण्याचे ठरविले.
- ☞ मलनि:स्सारण प्रक्रिया संयंत्राचे स्थलांतर झाल्यानंतर त्याची किंमत रु. २२.५१ कोटींवरून वाढून रु. ४०.८२ कोटी इतकी झाली म्हणजे ही किंमत रु. १८.३१ कोटींनी वाढली. त्याचप्रमाणे नगर विकास विभागाची सप्टेंबर, २०१७ची अधिसूचना आणि वर्ष २०१४ मधील राष्ट्रीय हरित लवादाचे आदेश पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला माहिती असूनही प्रतिबंधित क्षेत्रात मलनि:स्सारण प्रक्रिया संयंत्र उभारणीचे काम हाती घेतले. सप्टेंबर, २०१७ मध्ये नगर विकास विभागाने अधिसूचना जारी केली असतानाही महानगरपालिकेच्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे गरजेचे होते. मात्र ते केले गेले नव्हते.

## ४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

- ☞ प्रलंबित क्षेत्रातील बांधकामाला प्रशासकीय मंजुरी देण्याआधी योग्य दक्षता न बाळगल्याबद्दल शासनाने नगर विकास विभाग आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिके मधील दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी.
- ☞ राज्य शासनाने भविष्यात प्रकल्प राबविताना अशा प्रकारे होणारे उल्लंघन टाळण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत.

सप्टेंबर, २०१७ मध्ये नगर विकास विभागाने प्रतिबंधित क्षेत्रात मलनिःस्सारण प्रक्रिया संयंत्राचे बांधकाम करू नये अशी अधिसूचना जारी करूनही पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेने प्रतिबंधित क्षेत्रात बांधकाम केले. त्यासाठी कंत्राटदाराला रु. १५६ कोटी ७ लाखांचे काम देण्यात आले. सदर काम इंद्रायणी नदीच्या क्षेत्रात येत असल्यामुळे राष्ट्रीय हरित लवादाने जानेवारी, २०२० मध्ये सदर बांधकाम जमीनदोस्त करण्याचे निर्देश दिले. त्याविरोधात पिंपरी - चिंचवड महापालिकेने मान. सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. जी फेब्रुवारी, २०२० रोजी न्यायालयाने फेटाळून लावली. त्यामुळे संयंत्र बांधकामावर झालेला रु. ३ कोटी २५ लाखांचा संपूर्ण खर्च वाया गेला.

## ५. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून रस्त्यांची कामे करणाऱ्या २ मर्जीतल्या कंत्राटदारांना जास्तीचा फायदा!

**मे. जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड व मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल या कंत्राटदारांना अधिकाऱ्यांनी रु. ४ कोटी ३६ लाखांचा जास्तीचा फायदा करून दिला.**

☞ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाच्या १७ कंत्राटांच्या लेख्यांची जानेवारी ते मार्च, २०२१ या कालावधीत तपासणी केली असता असे उघड झाले की, तीन कंत्राटांमध्ये अतिरिक्त बाबींच्या प्रदानांची निविदा अट उर्वरित १४ कंत्राटांमधील निविदा अटींशी विसंगत होती. या तिन्ही दरसूचीमध्ये अतिरिक्त बाबींसाठी जास्तीचा नफा देण्याची बाब निश्चित केली होती. त्यामुळे या तीन कंत्राटदारांना जास्तीचा रु. ४.३६ कोटींचा फायदा झाला. याचाच अर्थ तेवढ्याच रकमेचे शासनाचे नुकसान झाले.

**रस्त्याची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना जिल्हा दरसूचीपेक्षा जास्तीचा फायदा:**

तक्ता क्र. ४ *(रु. कोटीत)*

| अक्र | कंत्राटदार | कार्याचे नाव | जिल्हा दरसूचीनुसार निश्चित केलेली रक्कम | कंत्राटदाराला दिलेला अतिरिक्त फायद्याची रक्कम | अतिरिक्त फायद्यासह एकूण रक्कम | जिल्हा दर सूची पेक्षा वाढीव रक्कमा (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे. जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड. | बीकेसी 'जी' ब्लॉक पासून पूर्व आणि पश्चिम द्रुतगती मार्गांना जोडणारा उन्नत मार्गाचे आकृतिबंध आणि बांधकाम. | ६.३१ | ०.९५ | ७.२६ | १५ |
| २. | | कॉरिडॉरचे आकृतिबंध व बांधकाम: अ) कुर्ला ते वाकोला जंक्शन सहित वाकोला उड्डाणपूलापर्यंत रस्त्याचे बांधकाम. ब) एम.टी.एन.एल. जंक्शन, बीकेसी पासून एल.बी.एस. उड्डाणपूलापर्यंत रस्त्याचे बांधकाम. | ३६.०९ | २.८९ | ३८.९८ | ८ |
| ३. | मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल. | डायमंड हाऊस, बीकेसीपासून वाकोला जंक्शनपर्यंत उन्नत मार्गाचे आकृतिबंध व बांधकाम | ६.४९ | ०.५२ | ७.०१ | ८ |
| | | **एकूण** | ४८.८९ | ४.३६ | ५३.२५ | ८.१९ |

☞ महालेखापरीक्षकांनी जानेवारी ते मार्च , २०२१ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १७ कंत्राटांची चाचणी केली असता, असे लक्षात आले की, त्यापैकी मे. जे.जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड व मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल या कंत्राटदारांना तीन कामात जिल्हा दरसूचीनुसार रु. ४८ कोटी ८९ लाखांची रक्कम देणे बंधनकारक असताना रु. ५३ कोटी २५ लाखांची रक्कम देण्यात आली त्यामुळे वरील २ कंत्राटदारांना नेमून दिलेल्या ३ कामांमध्ये रु. ४ कोटी ३६ (८.१९%) लाखांचा अतिरिक्त फायदा झाला.

☞ मे. जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेडला, बीकेसी 'जी' ब्लॉक पासून पूर्व आणि पश्चिम द्रुतगती मार्गांना जोडणारा उन्नत मार्गाचे आकृतिबंध आणि बांधकाम करण्यासाठी दरसूचीनुसार ६ कोटी ३१ लाखांची रक्कम देणे गरजेचे असताना प्रत्यक्षात रु. ७ कोटी २६ लाखांची रक्कम देण्यात आली. कंत्राटदाराला या कामात ९५ (१५%) लाख रुपयांचा अतिरिक्त फायदा करून देण्यात आला.

☞ मे. जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेडला, अ) कुर्ला ते वाकोला जंक्शनसहित वाकोला उड्डाणपूलापर्यंत रस्त्याचे बांधकाम, ब) एम.टी.एन.एल. जंक्शन, बीकेसीपासून एल.बी.एस. उड्डाणपूलापर्यंत रस्त्याचे बांधकाम या दोन्ही कामांसाठी जिल्हा दरसूचीनुसार रु. ३६ कोटी ९ लाखांची रक्कम देणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात रु. ३८ कोटी ९८ लाख इतकी रक्कम देण्यात आली म्हणजे कंत्राटदाराला या कामात रु. २ कोटी ८९ (८%) लाखांचा अतिरिक्त फायदा करून देण्यात आला.

☞ मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल या कंत्राटदाराला डायमंड हाऊस, बीकेसीपासून वाकोला जंक्शनपर्यंत उन्नत मार्गाचे आकृतिबंध व बांधकाम या कामासाठी दरसूचीनुसार रु. ६ कोटी ४९ लाखांची रक्कम देणे बंधनकारक होते. मात्र प्रत्यक्षात रु. ७ कोटी १ लाख देण्यात आले. म्हणजे कंत्राटदाराला या कामासाठी रु. ५२ (८%) लाखांचा अतिरिक्त फायदा करून देण्यात आला.

## ५.७ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

☞ *भविष्यात अशा सदोष अटी निविदांमध्ये समाविष्ट होणार नाहीत याची काळजी घ्यावी.*

☞ *अनियमितता गैरव्यवहार यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अंतर्गत नियंत्रण मजबूत करावे.*

☞ *ठेकेदारांना करण्यात आलेले अतिरिक्त प्रदान त्यांच्याकडून वसुल करण्यात यावे.*

## ६. मालमत्ता कराची चुकीची आकारणी केल्याने मुंबई महानगरपालिकेला ७ कोटी ८५ लाख रुपयांचे नुकसान!

☞ मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८च्या कलम १३९ अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जमीन आणि इमारतींवर मालमत्ता कर आकारते. मालमत्ता करांमध्ये पाणी कर, मलनि:स्सारण कर, सामान्य कर, शिक्षण उपकर इत्यादीचा समावेश असतो. बृहन्मुंबई महानगरपालिका 'के'-पश्चिम प्रभागाचे सहाय्यक निर्धारक आणि संकलक कार्यालयाच्या अभिलेख्याची मार्च, २०२० रोजी तपासणी केली असता, जुलै, २०१४ मध्ये मालमत्ता कर आकारणीसाठी मालमत्तेचे भांडवली मूल्य ठरवताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने या जमिनीचे मोकळी जमीन असे वर्गीकरण करण्याऐवजी मालमत्तेचे दुकान/व्यावसायिक इमारत असे वर्गीकरण केले होते. चुकीच्या वर्गीकरणामुळे भांडवली मूल्याची चुकीची गणना झाली. महानगरपालिकेच्या चुकीच्या कर आकारणीमुळे रु.७.८५ कोटी मालमत्ता कराची कमी आकारणी झाली.

## ६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेली शिफारस

☞ *यापुढे मालमत्तेचे वर्गीकरण योग्य पद्धतीने कसे होईल याची प्रशासकीय स्तरावर काळजी घेतली जावी.*

> *मार्च, २०२० ते फेब्रुवारी, २०२१ या कालावधी मध्ये २९ जिल्ह्यात जेथे प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजना लागू केल्या होत्या. तेथील रस्त्याच्या १ हजार २४३ कामांमध्ये वस्तू व सेवा कराच्या (G.S.T.) चुकीच्या अंमलबजावणीमुळे कंत्राटाची किंमत कमी करण्यात कार्यकारी अभियंता (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना) यांना अपयश आले. त्यामुळे कंत्राटदारांना रु. २८ कोटी ६३ लाखांचे अतिरिक्त प्रदान झाले.*

## ७. ग्रामीण विकास विभागाने रस्त्यांच्या कामात कंत्राटदारांना रु. २८ कोटी ६३ लाखांचे अतिरिक्त प्रदान

☞ वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ नुसार वस्तू व सेवा कर व्यवस्थेतील कर हे आधीच्या कर व्यवस्थेच्या तुलनेत कमी असल्याने आणि कंत्राटदारांकडून नफेखोरी टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने परिपत्रक काढून ग्रामविकास विभाग व पंचायतीराज विभागाकडून मार्च, २०२० ते फेब्रुवारी २०२१ या एका वर्षाच्या कालावधीत संपूर्ण राज्याची माहिती मागवली. प्राप्त माहितीवरून असे लक्षात आले की, ३४ जिल्ह्यांपैकी २९ जिल्ह्यांमध्ये जेथे योजना लागू झाली होती. तेथील १ हजार २४३ रस्त्यांच्या कामांमध्ये कंत्राटांची रक्कम नियमानुसार कमी न केल्यामुळे कंत्राटदारांना रु.२८.६३ कोटींचे अतिरिक्त प्रदान झाले. यावरून या योजनेवर ग्रामीण विकास विभागाचे सनियंत्रण किती सुमार आहे, याचा अंदाज येतो.

### ७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

☞ ***ग्राम विकास विभागाने अंतर्गत नियंत्रण व सनियंत्रण यंत्रणा मजबूत करावी.***

☞ ***ठेकेदारांना झालेले अतिरिक्त प्रदान वेळेत वसूल करण्यासाठी कायदेशीर कारवाई सुरू करावी.***

## ८. अपूर्ण जलविद्युत प्रकल्पामुळे निधीची अडवणूक!

**आजही या विद्युत प्रकल्पाचा जनसामान्यांना लाभ नाही,**

**शासनाचे रुपये २५० कोटी अडकून पडले!**

☞ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कोयना धरणाच्या डाव्या तीरावर ८० मेगावॅट जलविद्युत प्रकल्पाच्या बांधकामासाठी फेब्रुवारी २००४ मध्ये रु. ३७९.७८ कोटींची मान्यता मिळवली. वीज निर्मितीचा अंदाजित खर्च रु. २.४९ प्रती युनिट होता. मात्र प्रकल्पावरील खर्च वाढल्याने मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प यांनी सुधारित किमतीस मान्यता मिळेपर्यंत काम संस्थगित ठेवण्याचे मार्च, २०१५ रोजी निर्देश दिले. तोपर्यंत या प्रकल्पावर रु. २५०.०३ कोटी खर्च झाले होते. मात्र सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी हा प्रकल्प ऑक्टोबर, २०२१ पर्यंत अपूर्णच राहिला होता.

### ८.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

☞ ***जलविद्युत प्रकल्पाच्या अंमलबजावणीत होणारा विलंब टाळण्यासाठी जलसंपदा विभागाला प्रस्ताव सादर करण्याची आणि मंजूर करण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात यावी.***

## ९. राज्यातील १३ सहकारी सूत गिरण्यांकडे १९५ कोटी ८८ लाख रुपयांची कर्ज वसुली थकली!

☞ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने अनुसूचित जातीच्या राज्यातील १३ सहकारी सूत गिरण्यांना मार्च, २०२१ पर्यंत रु. २७५.७८ कोटींचे दीर्घ मुदतीच्या कर्जाचे वाटप केले होते. त्यापैकी ८ सूत गिरण्यांमधून जून २०१६ ते मार्च २०२४ पर्यंत रु.१९५.८८ कोटी रकमेची वसूली करायची होती. ऑगस्ट २०२१ पर्यंत केवळ एका सहकारी सूत गिरणीकडून रु. १.१० कोटी रुपयांची वसुली करण्यात आली तर इतर ७ सूत गिरण्यांची रु. १९०.८७ कोटी रुपयांची वसूली प्रलंबित होती. याबाबत थकबाकीच्या वसुलीसाठी मा. आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी दर तीन महिन्याला वसुलीचे मागणीपत्रक पाठवूनही कर्जाची वसूली झालेली नव्हती. त्याचप्रमाणे सूत गिरण्यांच्या सभासदांच्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी केली नसल्याचे निदर्शनास आले.

***रु. २५० कोटी खर्च होऊनही अपूर्ण राहिलेल्या जलविद्युत प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब झाल्यामुळे ६ वर्षांहून अधिक काळ सर्वसामान्य जनता जलविद्युत प्रकल्पाच्या लाभांपासून वंचित!***

**सहकारी सूत गिरण्या ज्यांना सामाजिक न्याय विभागाने कर्ज वितरित केले, मात्र १३ पैकी १२ सूत गिरण्यांनी त्याचा परतावा केलेला नाही:**

**तक्ता क्र. ५** — **रु. कोटीत**

| अक्र | सूत गिरणीचे नाव | प्रकल्प किंमत | सा.न्या.वि. वितरित रकमा | कर्ज वितरणाच्या तारखा | वसुलीची रक्कम | वसुल झालेली रक्कम | सूत गिरणी सुरू झाल्याची तारीख | व्याजासह कर्ज वसुली पूर्ण होण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दीनदयाळ मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, सांगली. | ६१.०० | २२.०० | जुलै,१९९८-मार्च, १९९९ | - | परतावा नाही. | ०१/०९/२००० | - |
| २. | मातोश्री रमाबाई आंबेडकर मागासवर्गीय सूत गिरणी, कोल्हापूर. | ६१.५० | १७.८१ | जून,२००१ - एप्रिल,२०१६ | १७.८१ | ०.०० | सुरूच झाली नाही. | मे, २०२४ |
| ३. | रत्नप्पा कुंभार मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, कोल्हापूर. | ६१.०० | २३.५३ | ऑगस्ट,२००१-एप्रिल, २०१६ | २३.५३ | ०.०० | ऑक्टोबर, २००८ | सप्टेंबर, २०२२ |
| ४. | महात्मा फुले मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, सोलापूर. | ६१.७४ | २४.६३ | मार्च,२०००-मार्च, २०११ | २४.६३ | ०.०० | १५/१०/२००२ | एप्रिल, २०१९ |
| ५. | महात्मा फुले अनुसूचित जाती/जमाती सहकारी सूत गिरणी, सोलापूर. | ५८.५० | २५.८२ | जून, १९९९-जाने.२०१३ | २५.८२ | ०.०० | ०१/०३/२००१ | फेब्रुवारी, २०२१ |

| अक्र | सूत गिरणीचे नाव | प्रकल्प किंमत | सा.न्या.वि. वितरित रकमा | कर्ज वितरणाच्या तारखा | वसुलीची रक्कम | वसुल झालेली रक्कम | सूत गिरणी सुरू झाल्याची तारीख | व्याजासह कर्ज वसुली पूर्ण होण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, परभणी. | ५२.५२ | २५.६९ | नोव्हें.१९९८-मार्च, २००९ | २५.६९ | ०.०० | सुरूच झाली नाही. | एप्रिल, २०१७ |
| ७. | प्रियदर्शिनी मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी लातूर. | ५३.०० | १२.३३ | ऑगस्ट,२०००-एप्रिल,२०१३ | - | – | सुरूच झाली नाही. | - |
| ८. | माणदेश प्रबोधनकार ठाकरे मागासवर्गीय सूत गिरणी, सातारा. | ६१.७४ | २७,६६ | मार्च, २०११-नोव्हें. २०१३ | २७.६६ | ०.०० | ०१/०७/२०१५ | डिसेंबर, २०२१ |
| ९. | कृष्णा वेरळा मागासवर्गीय सूत गिरणी, पलूस, सांगली. | ६०.५६ | २५.४० | जाने.२००५-मे, २००८ | २५.४० | १.१० | २१/०८/२००७ | जून, २०१६ |
| १०. | मधुकरराव घाटे मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, नांदेड. | ६०.०० | ७.३५ | मार्च, २०१३ | - | – | सुरूच झाली नाही. | - |
| ११. | मातोश्री मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, नागपूर. | ५२.३० | २५.३४ | नोव्हें.२०१२-नोव्हें. २०१५ | २५.३४ | ०.०० | डिसेंबर, २०१७ | डिसेंबर, २०२३ |
| १२. | महालक्ष्मी मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, सांगली. | ५२.९६ | २१.२२ | मार्च, १९९९-मार्च, २०१० | - | ०.०० | २००१ पासून | - |
| १३. | गौतम मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, नागपूर. | ५८.७४ | १७.०० | नोव्हें. २०१४ - मे, २०१५ | - | ०.०० | सुरू झाली नाही. | - |
| **एकूण** | | **७५५.५६** | **२७५.७८** | - | **१९५.८८** | **१.१०** | - | - |

☞ सामाजिक न्याय विभागाने राज्यातील १३ सहकारी सूत गिरण्यांना जुलै, १९९८ ते मे २०१५ या १७ वर्षाच्या कालावधीत रु. २७५ कोटी ७८ लाखांचे कर्ज दीर्घ मुदतीसाठी वितरित करण्यात आले होते. त्यापैकी रु. १९५ कोटी ८८ लाखांच्या कर्जाची जून २०१० ते मे २०२४ पर्यंत वसुली होणे गरजेचे होते. मात्र त्यापैकी केवळ रु. १ कोटी १० लाखांचा निधी वसूल करण्यात आला. कर्ज वसुलीचे प्रमाण ०.४०% इतके कमी होते.

☞ कृष्णा वेरळा मागासवर्गीय सूत गिरणी, पलूस, सांगली, यांनी रु. २५ कोटी ३४ लाखांचे कर्ज घेतले होते त्यापैकी त्यांच्याकडून फक्त रु. १ कोटी १० लाखांच्या कर्जाची वसूली झाली. कर्ज वसुलीचे हे प्रमाण ४.३४% इतके कमी होते. मात्र इतर १२ सूत गिरण्यांकडून १ रुपयाचीही कर्ज वसूली विभागाला करता आलेली नाही.

☞ <u>**सुरू न झालेल्या ५ सहकारी सूत गिरण्यांना देण्यात आलेले कर्ज**</u>:

१. मातोश्री रमाबाई आंबेडकर मागासवर्गीय सूत गिरणी, कोल्हापूर (रु. १७ कोटी ८१ लाख)

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, परभणी, (रु. २५ कोटी ६९ लाख)

३. प्रियदर्शिनी मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, लातूर, (रु. १२ कोटी ३३ लाख)

४. मधुकरराव घाटे मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी नांदेड, (रु. ७ कोटी ३५ लाख) व

५. गौतम मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी नागपूर यांना (रु. १७ कोटी) असे कर्ज देण्यात आले होते. मात्र नोव्हेंबर १९९८ ते मे २०१५ या १७ वर्षाच्या कालावधीत वरील ५ पैकी एकही सूत गिरणी सुरू झाली नाही. त्यामुळे या सूत गिरण्यांमध्ये विभागाचा रु. ८० कोटी १८ लाखांचा निधी अडकून पडला.

## ९.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

☞ *जिल्हा समाजकल्याण अधिकारी / विभागीय समाज कल्याण अधिकारी / आयुक्त यांनी या योजनेअंतर्गत कर्जाचे वाटप करण्यापूर्वी सहकारी सूत गिरण्यांचे अनुसूचित जातीचे सभासद ७० टक्क्यांपेक्षा जास्त आहेत याची खात्री करावी.*

☞ *सहकारी सूत गिरण्यांच्या सभासदांची जात पडताळणी केल्यानंतरच सूत गिरणीसाठी कर्जाचे वाटप करण्यात यावे.*

☞ *कर्जाची व त्यावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी विभागाने लवकरात लवकर कारवाई सुरू करावी.*

***सहकारी सूत गिरण्यांना सामाजिक न्याय विभागाने दिलेल्या कर्जाची परतफेड करण्यास सूत गिरण्यांची दयनीय अवस्था कारणीभूत होती आणि म्हणूनच रु. १९१ कोटींची वसुली योग्य रक्कम १ ते ९ वर्षांच्या कालावधी दरम्यान प्रलंबित होती. त्याचप्रमाणे शासनाने कर्ज दिलेल्या सूत गिरण्यांतील सभासदांची जात पडताळणी केल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसल्याचे तपासणीत निदर्शनास आले.***

## १०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने समाज प्रबोधनासाठी केलेला खर्च वाया!

### सामाजिक जागृतीसाठी बार्टीने जे काम हाती घेतले होते; ते पूर्णत्वाकडे नेण्यात पूर्णतः अपयश!

☞ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) या स्वायत्त संस्थेने जुलै, २०१४ मध्ये 'समता दूत प्रकल्प' राबवण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पाच्या उद्दिष्टानुसार अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९चा कायदा समजून घेण्यासाठी मदत करणे व त्याची प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकांमध्ये जागरुकता व जाणीव निर्माण करणे, जातीभेद नष्ट करणे, भेदभाव दूर करणे, त्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी नेमणे, संभाव्य लाभार्थी शोधणे तसेच त्यांना विविध शासकीय योजना समजून घेण्यासाठी व अर्ज करण्यासाठी मदत करणे ही सर्व कामे त्यात अंतर्भूत होती. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) यांनी मोबाईल आणि वेबसाईट ॲप्लिकेशन विकसित करण्याचे काम सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स कॉम्प्युटींग-सीडॅक (C-DAC) या संस्थेला दिले होते. सदर ॲप्लिकेशन व सॉफ्टवेअर दि. २२ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत उपयोजना आज्ञावलीची होस्टींग करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. त्यामध्ये डॅशबोर्ड, जीपीएस ट्रॅकिंग, लाभार्थ्यांशी संभाषण करताना गोळा केलेल्या चित्रफिती, संभाषण आणि प्रतिमा अपलोड करण्याची सुविधा, सर्वेक्षण फॉर्म भरण्याची सुविधा, विविध आलेखित (Graphical) अहवाल तयार करण्याची सुविधा या सर्व बाबींचा समावेश होता. त्यासाठी सप्टेंबर, २०१५ रोजी रु. ६०.२० लाखांचे ७०० भ्रमणध्वनी (Mobile Instruments) खरेदी केले होते. सी-डॅकने स्वत:चे काम सप्टेंबर, २०१५ मध्ये पूर्ण केले. त्यानुसार या कामासाठी 'समता दूतां'ना कंत्राटी पद्धतीने (Contract Basis) नियुक्त केले. त्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर ऑगस्ट, २०१६ मध्ये त्यांची सेवा समाप्त करण्यात आली. त्यानंतर बाह्यस्त्रोत अभिकरणाद्वारे (Outsourcing Agency) समता दूतांची नियुक्ती केली जात होती.

☞ मार्च २०२० रोजी महासंचालक बार्टी यांच्या अभिलेख्याची छाननी केली असता तसेच जून आणि सप्टेंबर, २०२१ रोजी प्राप्त झालेल्या अतिरिक्त माहितीनुसार नंतर बाह्यस्त्रोताद्वारे नेमलेल्या समता दूतांना भ्रमणध्वनी (Mobile Instruments) संच पुरविण्यात आले नव्हते. समता दूत त्यांच्याच भ्रमणध्वनीचा वापर करून लाभार्थ्यांकडून मिळालेली सर्व माहिती इमेल, व्हाट्स ॲप किंवा प्रत्यक्ष कागदपत्राद्वारे पाठवत होते. त्याचे कारण सी-डॅकने आपली सेवा देणे बंद केल्याने मोबाईल ॲप्लिकेशन व सॉफ्टवेअर बंद झाले होते. त्यामुळे ते भ्रमणध्वनी समता दूतांना देण्यात

आले नव्हते. लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, बार्टीला समता दूतांकडून जमा केलेल्या माहितीद्वारे उपयुक्त असा अहवाल तयार करता आला नाही. सी-डॅकने सांकेतांक (Source Code) न दिल्यामुळे खरेदी केलेली उपयोजना आज्ञावली (Software Application) आणि भ्रमणध्वनी (Mobile Instruments) एक वर्षानंतर उपयोगात आली नाही, परिणामी या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी केलेला रु. ९४.३८ लाखांचा खर्च वाया गेला व ज्या उद्देशाने काम हाती घेतले होते ते तडीस नेण्यास बार्टीला पूर्णत: अपयश आले.

## १०.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

- ☞ *बार्टीने सामाजिक न्यायाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी समता दूतांद्वारे वा इतर विद्यमान पद्धतीने जमा केलेल्या माहितीचा अहवाल लवकरात लवकर तयार करावा.*
- ☞ *संस्थेतील अधिकाऱ्यांनी 'सी-डॅक' या संस्थेबरोबर सांकेतांक मिळविण्याबाबत ढिलाई केली असेल तर त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.*

*जुलै, २०१४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) या स्वायत्त संस्थेने 'समता दूत प्रकल्प' राबवण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पाच्या उद्दिष्टांमध्ये अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, जातीभेद निर्मूलनासाठी तसेच विविध शासकीय योजनांसाठी संभाव्य लाभार्थी ओळखण्यासाठी 'सी-डॅक' या सॉफ्टवेअर कंपनीने जे कॉम्प्युटर सॉफ्टवेअर व मोबाईल ॲप्लिकेशन तयार केले होते त्याचा सांकेतांक (Source Code) देणे बंद केले. त्यामुळे सदर प्रणाली उपयोगात आली नाही. परिणामी खरेदी केलेली सदर आज्ञावली व भ्रमणध्वनी संच पडून राहिले.*

## ११. महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाने रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर येथे बांधलेले बहुद्देशीय केंद्र ५ वर्षापेक्षा जास्त काळ पडून!

### ५ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी वाया!

☞ गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी आयुक्त, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या अखत्यारीत रमाबाई आंबेडकर नगर घाटकोपर (पूर्व) येथे असलेल्या जमिनीवर शौचालये आणि बहुद्देशीय केंद्र बांधण्यासाठी मार्च २०१० मध्ये रु. ११.६० कोटी मंजूर केले. सदर काम महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाला दिले होते. मार्च, २०१६ मध्ये रु. ५.७१ कोटी खर्चून हे काम पूर्ण झाले. मात्र जमीन उपलब्ध न झाल्यामुळे आणि झोपडपट्टीधारकांच्या असहकारामुळे एकूण ५१० शौचालयांपैकी फक्त ३१५ शौचालयांचे बांधकाम केले गेले. तर १९५ शौचालयाचे काम प्रलंबित होते. मात्र ऑक्टोबर, २०२१ पर्यंत या बहुद्देशीय केंद्रांचा वापरच झाला नव्हता असे पाहणीत निदर्शनास आले. त्याची कारणे सरकारी अनास्था व दप्तर दिरंगाई असल्याचे निदर्शनास आले. या संबंधी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पत्रव्यवहारास जिल्हाधिकाऱ्यांनी त्वरित प्रतिसाद न देणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने जिल्हाधिकारी यांना कार्यान्वयासाठी वेळेत करारनामा सादर न करणे, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडून या संबंधी करार करण्यास विलंब होणे अशा वेगवेगळ्या पातळीवर उशीर झाल्यामुळे सदर प्रकल्पाचा उपयोग होत नव्हता. डिसेंबर, २०२१ पर्यंत झोपडपट्टी सुधार मंडळाला सदर प्रकल्पाचा भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने सदर प्रकल्प कार्यान्वयीत झालाच नाही. त्यामुळे हे बहुद्देशीय केंद्र तसेच पडून राहिले.

## ११.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

☞ ***संबंधित प्राधिकरणाने जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून बहुद्देशीय केंद्राचा करारनामा पूर्ण करण्यास व भोगवाटा प्रमाणपत्र मिळवण्यास दिरंगाई केली त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी.***

> ***मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई महानगरपालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर (पूर्व) येथे रुपये ५ कोटी ७१ लाख खर्चून बांधलेले बहुद्देशीय केंद्र ५ वर्षांपेक्षा जास्त काळ तसेच पडून राहिले.***

## १२. महाराष्ट्र राज्य वखार मंडळाने करपात्र उत्पन्नाचे चुकीचे अंदाज लावल्याने आयकर विभागाला रुपये २ कोटी ३६ लाख इतका दंड भरावा लागला!

☞ डिसेंबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या अभिलेख्याच्या छाननीत असे उघड झाले की, सन २०१७-१८च्या आर्थिक वर्षात रु. १४.९० कोटी करदायित्वाची गणना केली गेली. त्यानुसार रु.१४ कोटींची कर वजावट गृहित धरून चौथ्या तिमाहीत म्हणजे मार्च, २०१८ मध्ये रु.९० लाखांचे आगाऊ कराचे प्रदान केले गेले. सप्टेंबर, २०१८ मध्ये कराचे अंतिम निर्धारण करतेवेळी असे लक्षात आले की, वर्ष २०१७-१८शी संबंधित वखार साठवण (Were Housing) व हाताळणी शुल्काचे रु.६२.४७ कोटींचे उत्पन्न देय आगाऊ कराचा अंदाज घेताना विचारातच घेतले नव्हते. त्याचा परिणाम करदायित्वाची अंदाजित रक्कम रु. १४.९० कोटीवरून ती रु. ४१.१९ कोटींवर पोहेचली म्हणजे कराची ही रक्कम १७६% वाढली. परिणामी आगाऊ कराचे कमी प्रदान झाले. त्यामुळे राज्य वखार महामंडळाला कलम २३४-ब व कलम २-क, अंतर्गत अनुक्रमे रु. १.२६ कोटी व रु. १.१० कोटी असे एकूण रु. २.३६ कोटी दंड भरावा लागला. हा महामंडळाचा आर्थिक गलथानपणा होता.

☞ अशाप्रकारे, उत्पन्नाचा चुकीचा अंदाज केल्यामुळे आगाऊ कर प्रदान करण्यास विलंब झाल्यामुळे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु. २.३६ कोटी दंड भरावा लागला, जो टाळता आला असता.

## १२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

☞ ***महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची अंतर्गत कार्यालयीन व्यवस्था महामंडळाला भराव्या लागणाऱ्या आगाऊ कराची परिगणना करण्यात अपयशी ठरली असून ती मजबूत करण्यासाठी लवकरात लवकर पावले उचलावीत.***

***महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने करपात्र उत्पन्नाचा चुकीचा अंदाज केल्यामुळे आयकराचे (Income Tax) रुपये ४१ कोटी १९ लाखांऐवजी रुपये १४ कोटी ९० लाख इतके कमी करदायित्वाचे प्रदान करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रुपये २ कोटी ३६ लाखांचे व्याज भरावे लागले जे टाळता येऊ शकले असते.***

## १३. जमीन संपादनात अपयश आल्याने धरण बांधण्याचा खर्च वाया!

### रु. १५ कोटी २० लाखांचा खर्च धरणाबरोबरच वाहून गेला!

☞ मृद् व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी रायगड जिल्ह्यामधील रोहा तालुक्यातील पहुर येथील लघु पाटबंधारे प्रकल्पास ऑगस्ट, २००६ मध्ये रु. ४.३६ कोटींची प्रशासकीय मान्यता दिली. या प्रकल्पामध्ये ११७ हेक्टर जमिनीला सिंचित करण्यासाठी स्थानिक नाल्यावर मातीचे धरण, सांडवा, मुख्य नियंत्रक आणि ४.२२ किमी. उजव्या कालव्याचे बांधकाम समाविष्ट होते. त्यानंतर मार्च, २०११ मध्ये रु. १३.२४ कोटींची पहिली सुधारित मान्यता देण्यात आली व डिसेंबर, २०१५ मध्ये रु. १८.७४ कोटींची दुसरी सुधारित मान्यता देण्यात आली. प्रकल्पाचे काम मे २०१६ मध्ये पूर्ण झाले. मात्र लेखापरीक्षणात असे आढळून आले की, या मृद् व जलसंधारण विभागाने ४.२२ किमीच्या कालव्यासाठी भूसंपादनच केले नव्हते. या दरम्यान म्हणजे २०१२ मध्ये जिल्हाधिकारी रायगड यांनी दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडोर प्राधिकरणासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करून त्यांनी ही जमीन संपादीत केली. अशाप्रकारे कालव्याच्या बांधकामासाठी आवश्यक जमीन संपादीत करण्यातील विभागाच्या अपयशामुळे रु. १५.२० कोटी खर्चून ११७ हेक्टर जमिनीवर सिंचनाच्या उद्देशाने बांधलेल्या धरणाचा ५ वर्षांहून अधिक काळ उपयोगच करता आला नाही. त्यामुळे झालेला सर्व खर्च वाया गेला.

## १३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशी

☞ ***विभागाने कालव्याच्या बांधकामासाठी आवश्यक जमीन संपादीत करण्यासाठी प्रभावी पावले उचलली नाहीत, ही अतिशय गंभीर बाब असून त्यामुळे ११७ हेक्टर जमीन सिंचित होऊ शकलेली नाही. त्यामुळे मूळ उद्दिष्ट साध्य झालेले नाही. भविष्यात ही जमीन सिंचित कशी होईल यासाठी विभागाने प्रभावी उपाययोजना करावी.***

***रायगड जिल्ह्यामधील रोहा तालुक्यात मृद् व जलसंधारण विभागास जमीन संपादनात अपयश आल्याने धरण बांधण्यासाठी झालेला रु. १५ कोटी २० लाखांचा खर्च वाया गेला.***

*(**स्रोत:** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन अहवाल, सादर दि. १० मार्च, २०२२)*